# दैनिक सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- ३ रे ● अंक:- १०१ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● सोमवार ०२ जुन २०२५


## "काही गोष्टी मनात ठेवायच्या असतात..." ; कोकाटेंच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर अजित पवारांचा सल्ला

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा



**मुंबई :** काही गोष्टी मनात ठेवायच्या असतात, असा सल्ला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना दिला आहे. कोकाटेंना अजून गोष्टी मनात ठेवायची सवय नाही, असंही ते म्हणाले. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्याच्या दौऱ्यात नुकसान ग्रस्त शेतीची पाहणी करताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. “हार्वेस्टिंग झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय करणार, ढेकळांचे पंचनामे करायचे का?” असा सवाल करून त्यांनी शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या. राज्यात अवकाळी पावसामुळे शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असताना आणि शेतकरी मदतीसाठी आशेनं सरकारकडे पाहत असताना कोकाटे यांचं असं वक्तव्य वादग्रस्त ठरत आहे. त्यांच्या या वक्तव्यावरून विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. “माणिकराव कोकाटेंना अजूनही गोष्टी मनात ठेवायची सवय नाही. आता मला जास्त महागात पडतंय. शेतकऱ्यांच्या बाबतीत अशा गोष्टी बोलणं योग्य नाही. याबाबत मी मागेही त्यांना सांगितलं होतं. शेतकरी हा बळीराजा आहे, आपला पोशिंदा आहे. सगळ्या गोष्टी आम्हालाही माहीत आहेत, आम्हीसुद्धा शेतकरी आहोत. परंतु काही गोष्टी बोलून का दाखवा यच्या? मनात ठेवायच्या”, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली. एकीकडे ढेकळांच्या पंचनाम्याचं त्यांचं वक्तव्य चर्चेत असतानाच कोकाटे यांनी पुन्हा एकदा वाद निर्माण करणारी टिप्पणी केली होती. “कृषीमंत्रीपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकीच आणि मला हे खातं दिलंय”, असं ते म्हणाले. कोकाटे यांच्या वक्तव्यावरून टीका झाल्यानंतर त्यांनी त्यावर स्पष्टीकरण दिलं. “मी असं काही बोललोच नाही” असं ते म्हणाले. “राज्यात बऱ्याच ठिकाणी पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. फळबागांचं नुकसान झाल्याने त्याचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. काही भागात कांद्याच्या पिकाचंही नुकसान झालं आहे. जेवढं नुकसान झालंय, त्यानुसार पंचनामे करण्यास सांगितलं असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई दिली जाणार आहे. हे नैसर्गिकच आहे. सोयाबीन आणि कापसाचं पिक फारसं उरलेलं नाही. उभ्या असलेल्या फळ बागा महत्त्वाच्या आहेत आणि त्यांचे पंचनामे करणं गरजेचं आहे”, अशी सारवा सारव त्यांनी केली. नागालँडमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा झटका बसला आहे. राष्ट्रवादीच्या 7 आमदारांनी अधिकृतपणे मुख्यमंत्री नेफ्यू रिओ यांच्या नेतृत्वाखालील सत्ता धारी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोगेसिव्ह पार्टीत (NDPP) प्रवेश केला. अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी ही नागालँडमध्ये मुख्य आणि मोठा विरोधी पक्ष होता. आता हे आमदार सत्ताधारी पक्षात गेल्याने या सरकारला कुठलाही धोका उरलेला नाही.

### नेमकं काय म्हणाले अजित पवार?

**“माणिकराव कोकाटेंना अजूनही गोष्टी मनात ठेवायची सवय नाही. आता मला जास्त महागात पडतंय. शेतकऱ्यांच्या बाबतीत अशा गोष्टी बोलणं योग्य नाही. याबाबत मी मागेही त्यांना सांगितलं होतं. शेतकरी हा बळीराजा आहे, आपला पोशिंदा आहे. सगळ्या गोष्टी आम्हालाही माहीत आहेत, आम्हीसुद्धा शेतकरी आहोत. परंतु काही गोष्टी बोलून का दाखवायच्या? मनात ठेवायच्या”, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली.**

## काळजी घ्या! देशात कोरोनाच्या रुग्णात मोठी वाढ, कोरोनाचे रुग्ण 3 हजारांवर, कर्नाटक, महाराष्ट्रातही रुग्णसंख्या वाढली

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा




**मुंबई :** देशभरात कोरोना संसर्गाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. देशात कोविडच्या सक्रिय रुग्णांची संख्या ३,३९५ वर पोहोचली आहे, तर गेल्या २४ तासांत ४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली. केरळमध्ये सर्वाधिक १३३६ सक्रिय रुग्ण आहेत. कर्नाटक सरकारने एक परिपत्रक जारी केले आहे. यामध्ये, लोकांना नियमितपणे हात धुण्याची सवय लावण्याचा, खोकताना / शिंक ताना शिष्टाचार पाळण्याचा, गर्दी टाळण्याचा आणि आवश्यक असल्यास मास्क वापरण्याचा सल्ला दिलाय. आरोग्य मंत्राल याच्या आकडे वारीनुसार, दिल्ली, केरळ, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशमध्ये प्रत्येकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. दिल्लीतील एका ७१ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू न्यूमोनिया, सेप्टिक शॉक आणि किडनीच्या तीव्र आजारामुळे झाला. कर्नाटकातील एका ६३ वर्षीय रुग्णाचा, केरळमधील एका ५९ वर्षीय रुग्णाचा आणि उत्तर प्रदेशातील एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे.

### महाराष्ट्रात 467 तर दिल्लीत 375 रुग्ण!

शनिवारी मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या 24 तासात कोरोनामुळे चार जणांचा मृत्यू झाला. त्यात दिल्ली, केरळ, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशात प्रत्येकी एक जण दगावला. महाराष्ट्रात कोरोना रुग्णांची संख्या 467 तर दिल्लीत 375, गुजरातमध्ये 265, कर्नाटक मध्ये 234, पश्चिम बंगालमध्ये 205, तमिलनाडूमध्ये 185 आणि उत्तर प्रदेशात 117 रुग्ण संख्या आहे.

### कोणत्या राज्यात किती रुग्ण संख्या?

केरळ- १,३३६, महाराष्ट्र- ४६७, दिल्ली- ३७५, गुजरात- २६५, कर्नाटक- २३४, पश्चिम बंगाल- २०५, तामिळनाडू- १८५ ,उत्तर प्रदेश- ११७, राजस्थान- ६0, पुडुचेरी- ४१, हरयाणा- २६, मध्य प्रदेश- १६, झारखंड- ६, पंजाब- ५.

### आरोग्य विभाग सतर्क!

शुक्रवारी केंद्रीय आरोग्य आणि आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्र कोणतीही परिस्थि तीशी सामना करण्या साठी सज्ज असल्याचे स्पष्ट केले. एका वृत्तसंस्थेशी बोल ताना त्यांनी केंद्रीय आरोग्य विभाग आणि आयुष्य मंत्रालय पूर्णपणे सतर्क असल्याचे ते म्हणाले. केंद्र सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे ते म्हणाले.

### हे व्हेरिएंट या राज्यात सक्रिय!

नवीन कोरोना लाटेत ओमिक्रॉनचा J N . 1 व्हेरिएंट आणि त्याचे सर्व व्हेरिएंट्स LF.7 आणि NB.1.8 जबाबदार आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) JN.1 ला डिसेंबर 2023 मध्ये व्हेरिएंट ऑफ इंटरेस्ट जाहीर केला होता. हा व्हेरिएंट जास्त संक्रमक असल्याचे दावा करण्यात येत आहे.

## "बाबा आढाव यांचे आयुष्य कष्टकऱ्यांच्या सेवेसाठीच" शरद पवार यांच्याकडून कौतूक

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा



**पुणे :** बाबा आढाव यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य कष्टकऱ्यांच्या सेवेसाठी वेचले आहे. या वयात बाबा आढाव सक्रियपणे काम करत आहेत. आजही ते विधायक कामे करत आहेत. आपण त्यांचा शंभरावा वाढदिवस लवकरच साजरा करु, अशा शुभेच्छा शरद पवार यांनी बाबा आढाव यांना दिल्या.जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकरी चळवळीचे आधारस्तंभ बाबा आढावा यांचा ९५ वा वाढदिवस रविवारी साजरा करण्यात आला. पुण्यातील मार्केट यार्डमधील हमाल पंचायतीच्या कार्यालयात शरद पवार यांच्या उपस्थितीत बाबा आढाव यांचा वाढदिवस साजरा झाला. बाबा आढाव यांनी संपूर्ण आयुष्यभर कष्टकऱ्यांची सेवा केली. त्यांचा १०० वा वाढदिवस पण आपण मोठ्या उत्साहात साजरा करु, या शब्दांत अनोख्या शुभेच्छा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी दिल्या. बाबा आढाव यांचा गौरव करताना शरद पवार म्हणाले, ९५ वा वाढदिवस साजरा करण्याचे भाग्य काही लोकांनाच मिळते. मोजक्या लोकांच्या जीवनात हा क्षण येतो. बाबा आढाव यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य कष्ट कऱ्यांच्या सेवेसाठी वेचले. या वयात बाबा आढाव सक्रियपणे काम करत आहेत. आजही ते विधायक कामे करत आहेत. अन्याय अत्याचार विरोधात लढत आहेत. सामान्य माणसांचे ओझे हलके करण्याचे काम करत आहेत. आपण सर्वांसाठी ते मोठा आदर्श आहे. बाबा आढाव यांच्या कार्य कर्तुत्वाचे कौतूक करत शरद पवार म्हणाले, कष्ट कऱ्यांच्या जीवनात स्थिरता कशी येईल, त्याचा सातत्याने विचार करत बाबा काम करत राहिले. संपूर्ण आयुष्य कष्टकऱ्यांसाठी काम करत त्यांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांनी नेहमी सामान्य माणसांचे हितच पाहिले आहे. कष्टकरी, कामगार यांच्यासाठी ते काम करत राहिले आहेत. उपेक्षित समाजातील लोकांना संघर्ष करण्याची वेळ येऊ नये, यासाठी ते काम करत आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात बाबांनी मोठे कार्य केले. आम्ही लोकांनी त्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी घेतले आहे. बाबा आढाव यांनी त्यांचे आयुष्य समाजासाठी दिले आहे. त्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने सदिच्छा देतो. तसेच लवकरच त्यांचा शंभरावा वाढदिवस आपण साजरा करु, असे शरद पवार यांनी म्हटले. १९५३ सालापासून बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळीत भाग घेतला. या काळात त्यांनी हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, मोलकरीण पंचायत, पथारी व्यावसायिक पंचायत, कागद- काच- पत्रा कष्टकरी पंचायत, बांधकाम कामगार पंचायत, टेम्पो पंचायतीच्या माध्यमातून कष्टकराऱ्यांसाठी काम केले.

## “देशात वन नेशन वन हसबंड राबवताय का? फक्त पतीच...”; राऊत भडकले, भाजपावर हल्लाबोल!

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा




**मुंबई :** देशाच्या सेनेने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख भाजपाकडून वारंवार केला जात आहे. वेगवेगळ्या कार्यक्रमात या मोहिमेचा उल्लेख करून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रुपातील नेतृत्त्व किती कणकर आहे, हे भाजपाच्या नेत्यांकडून सांगितले जात आहे. आता भाजपाच्या याच मुद्द्यावरून राऊतांनी भाजपाला खडे बोल सुनावले आहेत. वन नेशन वन इलेक्शनप्रमाणे वन नेशन वन हसबंड मोहीम राबवली जात आहे का? असा सवाल राऊतांनी केला.भाजपा घरोघरी आता सिंदूर घेऊन जात आहे. देशात वन नेशन वन हसबंड अशी मोहीम राबवली जातेय का? फक्त पतीच आपल्या पत्नीला सिंदूर देत असतो. एखादी बाहेरची व्यक्ती घरी जाऊन अन्य महिलेला सिंदूर देत नाही, अशी थेट टीका संजय राऊत यांनी केली.तसेच, ज्या पद्धतीने तुम्ही वन नेशन वन इलेक्शन आणले आहे. त्याच पद्धतीने वन नेशन वन हसबंड असा नवा कार्यक्रम आणला आहे का? असा रोखठोक सवाल राऊतांनी केला आहे. मंत्री संजय शिरसाट यांचे पुत्र सिद्धांत शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये 67 कोटींचे हॉटेल विकत घेतले आहे. यावरून ठाकरेंच्या शिवसेनेने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. राऊतांनीही संजय शिरसाट यांच्याकडे एवढे पैसे कुठून आले, असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या या टीकेला संजय शिरसाटांनी उत्तर दिले होते. आता पुन्हा एकदा राऊतांनी शिरसाट यांच्यावर निशाणा साधला. आमच्या वक्तव्याला महत्त्व द्या, असे आम्ही तुम्हाला सांगितले आहे का? तुम्ही तिथे कांड केले आहे. हा महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा आदर का करतो हे त्यांना अजून समजले नाही. त्यांचे कौटूंबिक, मुलाच्या आणि स्वतःचे जास्त प्रॉब्लेम आहेत, असा हल्लाबोल शिरसाट यांनी केला. महानगर पालिकेच्या निवडणुकीवरही त्यांनी भाष्य केले. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाने निवडणुका होत आहेत. गेल्या तीन ते साडेतीन वर्षांपासून प्रशासकाने राज्य करणे म्हणजे भ्रष्टाचाराला सूट देणे आहे. यांनी नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य निवडणून आणू शकले नाहीत. विधान सभेच्या निवडणुकीत ते लबाडी आणि पैशाचा गैरवापर करून निवडून आले आहेत, असा आरोप राऊत यांनी केला. तसेच, आता निवडून यायची त्यांना खात्री नाही. मालेगावच्या महापालिका निवडणुकीत काय करायचे आहे त्यासाठी आम्ही काम करीत आहोत. जात, धर्म, गट, पैसा यांना सामोरे जाऊन मालेगाव मनपा निवडणूक लढवायची आहे. मालेगाव मनपा निवडणुकसाठी कोअर कमिटी तयार करणार, अशी माहिती राऊत यांनी दिली.

### राऊत काय म्हणाले?


**भाजपा घरोघरी आता सिंदूर घेऊन जात आहे. देशात वन नेशन वन हसबंड अशी मोहीम राबवली जातेय का? फक्त पतीच आपल्या पत्नीला सिंदूर देत असतो. एखादी बाहेरची व्यक्ती घरी जाऊन अन्य महिलेला सिंदूर देत नाही, अशी थेट टीका संजय राऊत यांनी केली.**

### प्रशासकाने राज्य करणे म्हणजे भ्रष्टाचाराला सूट देणे!

**महानगरपालिकेच्या निवडणुकीवरही त्यांनी भाष्य केले. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाने निवडणुका होत आहेत. गेल्या तीन ते साडेतीन वर्षांपासून प्रशासकाने राज्य करणे म्हणजे भ्रष्टाचाराला सूट देणे आहे. यांनी नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य निवडणून आणू शकले नाहीत. विधानसभेच्या निवडणुकीत ते लबाडी आणि पैशाचा गैरवापर करून निवडून आले आहेत, असा आरोप राऊत यांनी केला.तसेच, आता निवडून यायची त्यांना खात्री नाही. मालेगावच्या महापालिका निवडणुकीत काय करायचे आहे त्यासाठी आम्ही काम करीत आहोत. जात, धर्म, गट, पैसा यांना सामोरे जाऊन मालेगाव मनपा निवडणूक लढवायची आहे. मालेगाव मनपा निवडणुकसाठी कोअर कमिटी तयार करणार, अशी माहिती राऊत यांनी दिली.**

## अग्रलेख

## - आदत हो जाएगी -



हे खरंच भलतं अवघड असतं

मला अनेक वर्षांपूर्वीची आठवण आहे.... थोरली मुलगी नुकतीच 12वी ची परिक्षा संपवून पुण्याला निघाली होती. आमचे वास्तव्य तेव्हा कुमाऊंमधील हल्द्वानी या चिमुकल्या, निसर्गसंपन्न गाव- म्हणजेच खेडेवजा जागी होते. कोणे एके काळी नारायण दत्त तिवारी अविभाजित उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री असताना जपानी कंपनी होंडा आणि श्रीराम समूहाचे कोलॅबरेशन झाले आणि उत्तर प्रदेश आणि आताच्या उत्तरांचल प्रदेशात रुद्रपूरला होंडाच्या जनरेटर सेटचा कारखाना स्थापन झाला आणि मी तिथे महासंचालक म्हणून रुजू झालो.मुलींचं बारावीपर्यंत शिक्षण काठगोदाम.. म्हणजे हल्द्वानी जवळच्या शाळेत झालं.

माझी इच्छा महाराष्ट्रात पुढील शिक्षण व्हावे अशी होती आणि म्हणून तिची पुण्याला फर्ग्युसनला ॲडमिशन झाली अन ती पुण्याला गेली. पहिल्यांदाच घराबाहेर पडत होती आणि त्यात अख्खं आयुष्य उत्तरेत गेल्याने ती 'कुडी पंजाबन किंवा पहाडन' सर्वार्थाने होती- किंबहुना दोन्ही मुली कुड्या पंजाबन अन पहाडन होत्या.असो... खूप विषयांतर झाले... तिला काठगोदाम स्टेशन वरून दिल्ली मार्गे पुण्याला जायचे होते... लहान गाव... बहुभाषिक स्नेह्यांत खूप प्रेम अन एकमेकांच्या कुटुंबांचा घनिष्ठ परिचय यामुळे मोठ्ठा मेळावा स्टेशनवर निरोप द्यायला जमला होता... प्रत्येकाच्या मुलांच्या आणि आईवडिलांच्या जीवनातला हा सामान्य प्रसंग असला तरीही तो व्यक्तिश: असामान्यच अन हुरहुर लावणारा असतो.साश्रू डोळ्यांनी तिला बाय बाय केले अन घरी परतलो.सहा एक महिन्यांनी दिवाळीला ती घरी आली. ते 10 15 दिवस कसे गेले कळले नाही. मी पुन्हा तिला परत सोडायला नवी दिल्ली पर्यंत गेलो. गोवा एक्स्प्रेस होती अन उत्तरेतील खूप मुलं तेव्हा सुध्दा--- 1999 मध्ये पुण्याला शिकायला होती. त्या मुळे ट्रेन मध्ये पुण्याला जाणारी खूप मुलं होती. तरीही मला भरून आले होते. या भावना शब्दांत व्यक्त करणं खरोखरच कठीण आहे. माझे डोळे भरून आले होते- हो आजही तो क्षण आठवतोय.... मी मुलीची नजर चुकवण्याचा प्रयत्न करत होतो अन एवढ्यात माझ्या पाठीवर कोणातरी बुजुर्ग- वडीलधाऱ्या व्यक्तीचा हात जाणवला. वळून पाहिलं तर ती साधारण साठीतली एक रुबाबदार व्यक्ती होती. हळूवार आवाजात ते मला हिंदीत म्हणाले, " भाईसाहब! शायद कालेज जॉइन करने के बाद पहिली दफा छोडने आये हो इसलिए बहुत बुरा लग रहा है... आदत हो जाएगी!"मी कसानुसा हसलो, गाडी हलली, पुन्हा एकदा कन्येचा हात हातात घेतला अन म्हणालो काळजीघे... मेच्या सुट्टीत भेट होईलच."अशा प्रकारे तिच्या एम ए पर्यंत येणे जाणे चालू राहिले. तदनंतर आम्ही नाशिकला स्थलांतरित झालो. ती पुण्यात अन नंतर दिल्लीत नोकरीला होती.काही वर्षांनी तिचे लग्न झाले आणि ती अमेरिकेला गेली.भेटीतील कालावधी वाढत चाललाय.परवाच पाच आठवड्यांसाठी आली होती. येणार आहे म्हणून कळलं तेव्हा पाSSSSSSSSSSSSSSSSSSSSच आठवडे वाटत होते ते भुर्रकन उडून गेले. काय करू काय नको अशी अवस्था होती. खूप पत्ते खेळलो, हिंडलो, मायलेकींच्या हितगुजाला तर पारावार नव्हता... मी देखील बायस्टॅन्डर असूनही खूप आनंदात होतो...आमचीही वयं झाली आहेत अन त्या मुळे त्या भेटीच्या आठवणी, ' अशी पाखरे येती, स्मृती सोडूनी जाती" याची प्रचिती देतात.माझा हा अनुभव जगावेगळा नक्कीच नाही पण तो माझाच नाही का?आणि म्हणूनच दिल्ली स्टेशन वरील ते शब्द अजूनही आठवतात... "भाईसाहब आदत हो जाएगी" पण "आदत' होत नाही हो ... अन होऊ देखील नाही,.....

नाही का???

# शिव,शाहू,फुले आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपणारा संपादक !

## राजकारण असो की समाजकारण कोणतंही नेतृत्व !

## जनसामान्यांसाठी झटणारा हक्काचा माणूस !

# कैलासभाऊ राऊत


कदम कदम पर उरुजो जवाल देता है कौन है
जो मेरी मुश्कीलों को टाल देता है न जाने किनकी
दुआओं का असर है कि डुबने जाता हूँ तो समंदर उछाल देता है!



घडायला किंवा तयार व्हायला एक कालावधी जावा लागतो, टाकीचे भाव सोसल्याशिवाय दगडाला देवपण मिळत नाही तर माणसाला मान, मरातब, जगन्मान्यता कशी मिळेल कोणतंही नेतृत्व हे वारसा हक्कानं मिळण्यासारखं नसत, ती काही वडिलोपार्जित संपत्ती नाही की जी मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे आपोआप येईल मात्र काही लोकांना नेतृत्व देखील वारसा हक्कांनच मिळत आणि ते त्यासाठी लायक असतात असे म्हणावं लागेल, परंतु कुठलाही वारसा हक्क, समर्थसाथ नसताना देऊळगाव माळी सारख्या खेडेगावात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले आमचे मित्र दै. बातमीजगत चे मुख्य संपादक कैलास हरीभाऊ राऊत देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलढाणा, हे अतिशय संयमी, सुस्वभावी निर्व्यसनी, लोक संग्रहाचा गर्भश्री मंत माणूस, संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात ग्रामीण भागात सुपरीचित असलेले प्रखर वक्ते, निर्भिड पत्रकार विकासाभिमुख राज कारणी, आदर्श पत्रकार, संपादक, निर्भीड पत्रकार, भक्तीशिल गुरूसेवक, शेतकरी, गावकऱ्यांना सोबत घेऊन कायम गावातील गोरगरीब जनतेसाठी सहकार्य करणारे हाडाचे पत्रकार कैलास राऊत हे होय. देऊळगाव माळी सारख्या एका फुले शाहू आंबेडकरांचा वारसा जपणाऱ्या गावातच कैलास राऊत यांनी सामाजिक कार्याचा ध्यास घेतला आणि सातत्याने जिद, चिकाटी, व मेहनतीच्या जोरावर त्यांनी पत्रकारा रीतेतील मुख्य संपादक पदाचे शिखर गाठले. पत्रकारीतेसोबतच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातही ते कार्यरत आहे. हे विशेष! त्यांच्या व्यक्तिमत्वाचा हा परिचय. देऊळगाव माळी सारख्या लहानशा खेड्यात, अगदी गरीब कुटुंबा जन्मलेले असुन अगदी लहान वयापासून त्यांनी समाजकार्या चा ध्यास घेतला आणि पत्रकारिते चा श्रीगणेशा गिरवला तो 2003 पासून त्यांचे गुरू पंढरीनाथ देवकर यांच्या कडुन विशेष म्हणजे परिस्थिती बिकट असूनही कधी आपली परिस्थितीचा बाऊ न करता सातत्याने सामाजिक कार्यात सक्रियसहभाग घेणे असेल किंवा इतरांना मदत करणे असेल अगदी दातृत्वाच्या भूमिकेतून अनेकांना राऊत मदत करत असतात हे करत असताना वडिल हरीभाऊ राऊत व आई स्व. शांताबाई राऊत यांचा आदर्श पुत्र म्हणून नावलौकिक मिळवलेला आहे. ते नेहमी समाजातील तळा गाळातील गोर गरीब लोकांसाठी झटुन लोकांच्या समस्या सोडवणे असेल किंवा मदत करणे या कार्यात कायम असेल सहकार्य करत असतात. 'जनसा मान्यांच्या हितासाठीची पत्रका रिता हेच कैलास भाऊंचे खरे घर बनले. मेहकर तालुका नव्हे तर संपूर्ण बुलढाणा जिल्ह्या गावागावात सुरूवातीला कुंभार समाज संघ टनेच्या माध्य मातून केलेल्या कार्याबद्दल अनेक जेष्ठ नागरिक त्यांच्या पाठीशी कौतुकाचे वेळोवेळी थाप टाकतात. त्यांच्याशी बोलता नाही हा हाडाचा पत्रकार' ठायी ठायी जाणवतो. 2003 पासून खामगाव येणे सांज दै. प्रश्नकाल मध्ये पत्रकारिता सुरुवात केली. त्यांचा पत्रकारितेचा हा प्रवास दैनिक बातमीजगत वृत्तपत्र काढून ते यशस्वीपणे चालवत आहे. आता नव्यानेच त्यांच्यावर निर्भीड संपादक अशोकराव सोनवणे साहेब यांनी दैनिक लोकमंथनची बुलढाणा जिल्हा आवृत्ती संपादक पदाची जबाबदारी सुद्धा कैलास भाऊ राऊत त्यांच्या खांद्यावर दिलेली आहे. सक्षमप्राणे दिलेली जबाबदारी सांभाळत असून आज सर्वत्र बुलढाणा जिल्हाभर माणसे जोडणारा हाडाचा पत्रकार म्हणुन कैलासभाऊची ख्याती आहे .आणि ती वस्तुस्थिती आहे. मागील गेल्या पंधरा वर्षां पासून सातत्याने पत्रकारितेच्या माध्यमातून जन सामान्यांचा आवाज बुलंद करण्याचे काम पत्रकार कैलास राऊत करत आहे त्यासोबतच, गोरग रिबांसाठी अनेक वेळेस आत्मदहन वेळप्रसंगी प्रशास नासोबत न्यायासाठी आंदोल नाच्या माध्यमातून. सामान्यांना न्याय दिला. फुले शाहू आंबेड करांच्या विचारधारेने काम करत असताना. देऊळगाव माळी आणि परिसरात अनेक महा पुरुषांच्या जयंती पुण्यतिथी असेल समाज परिवर्तन संदर्भात व्याख्यानाचे कार्यक्रम असतील गोर गरिबांना त्यांच्यावर आलेल्या संकटातआर्थिक मदत मिळवून देणे असेल, अशा अनेक सामाजिक चळवळीत पत्रकार कैलास राऊत सक्रियसहभागी होत असतात.. कुंभार समाज संघटना, तरुणाई फाउंडेशन, पत्रकारांच्या विविध सामाजिक संघटना त्यामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघ अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ स्वराज्य पत्रकार संघ व्हाईस ऑफ मीडिया व मराठी पत्रकार परिषद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्य मातून सातत्याने पत्र कारांच्या हितासाठी ज्या ज्या वेळेस रस्त्यावर उतरण्याचा प्रसंग आला त्या प्रत्येक वेळेस ते सातत्याने आवर्जुन सक्रिय सहभागी होतात, त्यांनी मागील पंधरा वर्षात केलेल्या सामाजिक राजकीय व पत्रकारी तेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्या बबल त्यांना आजपर्यंत ११४ पेक्षा जास्त पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यासोबतच 30 पेक्षा जास्त सामाजिक संघटनेत ते पदाधिकारी म्हणून काम करतात. यातून त्यांची सामा जिक कार्यांची व्याप्ती लक्षात येते. गावाकडील मित्रांचा आर्थिक स्थर उंचवावा यासाठी सिद्धिविनायक स्वयं सहायता बचत गटाच्या माध्यमातून अनेक बचत गट उभारणीचे काम सुद्धा त्यांनी केले आहे. सोबतच फुले शाहु आंबेडकर विचाराचा त्यांच्या मनावर प्रचंड प्रभाव असून हे वाचन चळवळीची प्रचंड आवड असलेले व्यक्तिमत्त्व असुन या श्रद्धेतूनच पुस्तक चळवळ सक्रिय व्हावी यासाठी सातत्याने त्यांच्या घरी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला पुस्तक सप्रेम भेट देण्याचा उपक्रम सुद्धा ते वर्षभर राबवत असतात त्यांचा सामाजिक कार्याचा आलेख प्रचंड उंच असून माणसं जोडणारा पत्रकार म्हणून त्यांच्या कडे सातत्याने बघितले जाते. हृदयस्थ, सदाबहार, मनमिळावू, मन मोकळे स्वभाव, विनम्र, निगर्वी आपुल कीची महासागर माणुस कीची ज्योती, सर्जन शील, सृजनशील, तत्वनिष्ठ, दातृत्व, कर्तुत्ववान व्यक्तिमत्व असलेले कैलास भाऊ कृष्णा प्रमाणे सवंगड्यावर नितांत प्रेम करणारे, कर्णा प्रमाणे मित्रा साठी लढणारे, दोस्तो, दुनिया दारीची मिसाल असणारे, दोस्तीच्या दुनियेतील राजा माणुस, सर्वांच्याच सुख दुःखात सहभागी होणारे, प्रत्येकाला आपल्या कुटुंबातील सदस्य वाटावा असा हक्काचा माणूस म्हणून कैलास भाऊ कडे बघितल जात अशा या दिलदार मित्राला, वाढ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, आपण औक्षवंत, यशवंत, कित्तीर्वत व्हावे हीच निर्मिका चरणी नम्र प्रार्थना!!



- गजानन सरकटे -
कार्यकारी संपादक
दैनिक सेवाशक्ती टाईम









दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# हलविरा येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी
# युवकांनी आदर्श घ्यावा असे अहिल्याबाई होळकर यांचे कार्य - नानासाहेब राऊत

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



**जिंतूर :** तालुक्यातील चारठाणा येथून जवळच असलेल्या हलविरा येथे गावकऱ्यांच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. सभापती. नानासाहेब दादा राऊत, हलविरा येथील सरपंच संपत राठोड, माजी सरपंच राठोड पिनू काळे सुभाष काळे, नलवे, पंजाबराव काळे, अंबादास पवार, मुकुंदा, पत्रकार यादव मस्के व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हलविरा येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त नानासाहेब राऊत यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले. अहिल्या बाई होळकर हे धनगर साम्राज्यातील एक महान स्त्री शासक होत्या. त्यांचे कार्य महिलांनासाठी व आजच्या युवकांसाठी आदर्श आहे. अहिल्याबाईंनी प्रजेला आपले कुटुंब समजून न्याय व दयाळू पणाने राज्यकारभार केला. त्यांनी रस्ते, धर्मशाळा, अन्नछत्रे, विहिरी, घाट, मंदिरे इत्यादींची निर्मिती करून लोककल्याणकारी कार्य केले. त्यांनी केवळ आपल्या राज्या पुरतेच नव्हे, तर देशभरातील बारा ज्योति र्लिंग व इतर मंदिरांच्या जीर्णोद्धाराचे काम त्यांनी हाती घेतले आणि ते पूर्ण देखील केलं. श्रीनगर, हरिद्वार, केदारनाथ, बद्रीनाथ, ऋषि केश, प्रयाग, वाराणसी, नैमि षारण्य, पुरी, रामेश्वरम, सोमनाथ, नाशिक, ओंकारेश्वर, महाबळेश्वर, पुणे, इंदौर, श्रीशैलम, उडीपी, गोकर्ण, काठमांडू इत्यादी ठिकाणी मंदिरे बांधली. अहिल्यादेवी यांनी प्राथमिक स्तरावर शिव मंदिराचा जीर्णोद्धार केला. तीर्थक्षेत्रांवर मंदिरे व घाट बांधून धार्मिक आणि सांस्कृतिक एकतेला बळ दिले. त्यांची प्रशासन कुशल, पारदर्शक आणि लोकाभिमुख होती. स्त्रियांचा सन्मान, शेतकऱ्यांचे रक्षण आणि गरिबांच्या सेवे साठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. युवकांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा निःस्वार्थ सेवेचा आदर्शनेतृत्व व जबाबदारीचे भान समाजा साठी काहीतरी करण्याची भावना धर्म, परंपरा आणि आधुनिकतेचे संतुलन, त्यांच्या कार्याची युवकांनी दिशा घ्यावी.

# दारव्हा आगार मध्ये पेढे वाटून 77 वा वर्धापन दिन साजरा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्याम राठोड.**



**दारव्हा :** एसटी महामंडळ स्थापन होऊन 77 वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्य आज दारव्हा आगारा बस स्थानकावर रांगोळी काढून तसेच केळी चे पाने व आंब्याचे पाण्याची तोरणे लावून पूजा करण्यात आली यामध्ये आपली संस्कृती दाखविण्याचे काम येथील कर्मचारी यांनी दाखवले. तसेच दारव्हा आगाराचे आगार प्रमुख श्रीतीन कुमार उजवने व वाहतूक निरीक्षक सोनाली पवार यांनी स्थानकावर उपस्थित प्रवाशी यांना एस टी बस ने च प्रवास का करावा याबद्दल मार्गदर्शन करून प्रवाशांचे फुल गुच्छ व पेढे देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी त्यांच्या सहकारी कर्मचारी वाहक चालक यांनी उत्पनात वाढ झाल्याबद्दल व करण्याबद्दल आणि प्रवाशांना चंगली बस सेवा देण्याबद्दल अहवान केले. या प्रसंगी आगार प्रमुख आगार निरीक्षक, चालक वाहक व आस्थापनेतील सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# स्वा.विवेकानंद सार्वजनिक वाचनालयात अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त अभिवादन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

**रिसोड :** स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिसोड येथे पुण्यश्लोक अहिल्या बाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त कार्य क्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष बी. एन. चव्हाण तर प्रमुख उपस्थितीत रामचंद्र जाधव, केशव इंगळे होते प्रथम मान्यवरांच्या हस्ते पुण्य श्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे संचालक कमलाकर टेमधरे यांनी केले. ताकतोडे यांनी महिला शासक म्हणून कार्याविषयी सांगितले केशव इंगळे, रामचंद्र जाधव यांनी कर्तबगार मराठा महिला या विषयावर बोलताना कशाप्रकारे राज्य कारभार चालवला हे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष बी. एन. चव्हाण यांनी त्यांच्या आदर्श न्याय दाना विषयी सांगितले कार्य क्रमाला प्रा. रवी अंभोरे, जगन्नाथ ठोंबरे, डाखोरे ,सुमेध इंगोले, श्रीकांत मोरे, यश राऊत, उपस्थित होते.

# राज्य परिवहन महामंडळाचा 77 वा वर्धापन दिन साजरा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**



**पाथरी :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची स्थापना एक जून 1948 रोजी झाली असून तेव्हापासून "बहुजन हिताय बहुजन सुखाय"या ब्रीदवाक्यप्रमाने महाराष्ट्रातील प्रवाशांची अतिशय इमाने इतबारे सेवा केली आता 78 व्या वर्षात पदार्पण होत असून जनसामान्याची बस सेवा ही एक जीवनावश्यक अंग असून सर्वसामान्यांना ग्रामीण भागापासून तालुका जिल्हा जोडणारा एक दुवा म्हणजे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ आज एक जून 2025 रोजी पाथरी बस स्थानकात वर्धापन दिन साजरा केला याप्रसंगी प्रवासी बंधू भगिनींना मिठाई वाटून आनंद व्यक्त करण्यात आला यावेळी बहुसंख्य प्रमाणात महिला व पुरुष प्रवासी उपस्थित होते तसेच पाथरी आगारातील सर्व पदाधिकारी विशेषतः श्री प्रवीण भोंडवे (DYMO), श्री हनुमंत चपटे (आगार प्रमुख), श्री गजानन येदले(सहाय्यक वाहतूक अधीक्षक), श्री तालेवार (प्रभारक) श्री जाधव साहेब (सहाय्यक वाहतूक निरीक्षक), श्री सुनील राऊत (लिपिक), श्री शंकर चपाटे (वरिष्ठ लिपिक), तसेच वाहक चालक व महिला कर्मचारी उपस्थित होते याप्रसंगी पत्रकार श्री गजानन घुमरे व श्री सुनील तळेकर हे उपस्थित होते प्रवाशांना व अधिकाऱ्यांना एकमेकांनी गुलाब पुष्प देऊन अभिनंदन केले या वर्धापन दिनाचे विशेष म्हणजे महिला प्रवाशांनी रांगोळ्या काढून आनंदात भर टाकली आगार प्रमुख श्री चपटे साहेब व पत्रकार श्री गजानन घुमरे यांचे समायोजित भाषण झाले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निरोप समारंभ श्री गजानन येडले साहेब यांनी केले




# विरंगुळा भवन येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मुन्ना ठाकूर.**



**जिंतूर :** तालुक्यातील चारठाणा येथील संत जनार्दन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील ज्येष्ठ शिक्षक नामदेव सुकलाल जाधव यांचा दीर्घ सेवेनंतर ते वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. नामदेव जाधव यांनी शिक्षक या पदावर ३८ वर्ष कार्य केले. दरम्यान या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मुकुंद चव्हाण, रामराव चव्हाण, नामदेव चव्हाण, विलास चव्हाण, रोहित चव्हाण, केशव चव्हाण त्यांच्यासह संस्थेतील विविध कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान कार्यक्रमाचे प्रस्ताविक आर. एस राठोड यांनी केले. नामदेव जाधव यांचा संपत्नीक संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने सत्कार करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. दरम्यान यावेळी जाधव कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षकांनी जाधव यांच्या कामाची प्रशंशा करून त्यांच्या सेवानिवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. यावेळी विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नामदेव जाधव यांचा सेवापुर्ती निमित्त सेवा गौरव सोहळा सपत्नीक उत्साहात संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



**जिंतूर :** तालुक्यातील चारठाणा येथील संत जनार्दन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील ज्येष्ठ शिक्षक नामदेव सुकलाल जाधव यांचा दीर्घ सेवेनंतर ते वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. नामदेव जाधव यांनी शिक्षक या पदावर ३८ वर्ष कार्य केले. दरम्यान या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मुकुंद चव्हाण, रामराव चव्हाण, नामदेव चव्हाण, विलास चव्हाण, रोहित चव्हाण, केशव चव्हाण त्यांच्यासह संस्थेतील विविध कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान कार्यक्रमाचे प्रस्ताविक आर. एस राठोड यांनी केले. नामदेव जाधव यांचा संपत्नीक संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने सत्कार करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. दरम्यान यावेळी जाधव कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षकांनी जाधव यांच्या कामाची प्रशंशा करून त्यांच्या सेवानिवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. यावेळी विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निराधार विधवा ताईला उदरनिर्वाहासाठी शेळी व दोन करडू भेट
# पितृछत्र हरवलेल्या लेकरांची शैक्षणिक पालकत्व स्वीकारून जीवनावश्यक साहित्य मदत

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



जिंतूर : होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च & चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेने आज दि. 1 जून 2025 रोजी येथील निराधार विधवा ताईस उदरनिर्वाहासाठी शेळी व 2 करडू भेट दिले. तसेच पितृछत्र हरवलेल्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून त्या कुटुंबास एक महिना पुरेल एवढे जीवनावश्यक किराणा साहित्य भेट दिले. याप्रसंगी एचएआरसी अध्यक्ष डॉ पवन चांडक, प्रकाश डुबे, पत्रकार रंगनाथ गडदे, संतोष बारबिंडे, तुकाराम गीते, तुकाराम राठोड, भीमा पवार गावातील नागरीक उपस्थित होते. सविस्तर वृत्तांत असे की, तालुक्यातील चारठाणा येथील विठ्ठल गुलाब राठोड या तरुणाचे 13 मे 2025 रोजी अपघाती निधन झाल्या मुळे त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्याच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी व दोन मुली व एक मुलगा हे अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीमध्ये जीवन जगत आहेत. त्या कुटुंबास स्वतःची शेती किंवा जमीन नसल्यामुळे हे पती पत्नी ऊसतोड मजुरी करत होते. पतीच्या निधनानंतर ताईला उदरनिर्वाह कसा करावा ? मुलांचे शिक्षण कसे करावे ? असे प्रश्न भेडसावत आहेत. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुंगळाचे शिक्षक प्रकाश डूबे यांनी आज तातडीने त्यांची व्यथा जाणून घेतली आणि फोनवर या कुटुंबाची कैफियत एच ए आर सी संस्थेकडे मांडली. त्या कुटुंबास उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेळी व शेळीचे पिल्लू तसेच किराणा सामान देण्याचे आवाहन केले..

**- महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न -**

एचएआरसी संस्थेच्या वतीने आजवर परभणी व हिंगोली जिल्ह्यातील 70 निराधार, एचआयव्ही ग्रस्त, विधवा महिला व अनाथ मुलींना 44 शिलाई मशीन, 8 डाळ काढायची मशीन, 2 पिठाची गिरणी व 14 महिलांना शेळी व करडू व 1 बेंटेक्स दागिन्यांचे फिरते दुकान द्वारे स्वयंरोजगार व उदरनिर्वाहासाठी मदत केली आहे. मदत दिलेल्या महिला स्वावलंबी बनून कुटूंबाच्या उदरनिर्वाह साठी हातभार लावत आहेत.

**- डॉ.पवन चांडक, अध्यक्ष एच.ए आर.सी संस्था, परभणी -**

**- लोकसहभागातून मदत -**

संजय बन्सीलाल लाहोटी यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत त्या कुटुंबास उदरनिर्वाहाचे साधन शेळी व 2 करडूसाठी तर दिनेश चांडक, राजकुमार भगत, हार्दिक ठाकर यांच्या मदतीतून जीवनावश्यक किराणा साहित्य व शैक्षणिक पालकत्व स्वीकारून सहयोग दिला.

# राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्तेत्या श्रीमती रेखाताई मनेरे यांचा सन्मान

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**




पाथरी : दि. 31/05/2025 रोजी पाथरी येथे प्रहार संघटनेचे कार्यकर्ते मा.महेश जोशी सर यांनी सामाजिक कार्यकर्तेत्या नेहमी सक्रिय, कार्यकर्त्या श्रीमती रेखाताई मनेरे यांच्या कार्याची व कामाची दखल घेऊन विधवा, परीतक्ता, निराधार महिलांसाठी नेहमी सक्रिय व त्यांच्या न्याय, हक्कासाठी पुढाकार घेऊन त्यांना मदत करून त्यांच्या अडि अडचणी व अनेक प्रश्नन सोडविण्यासाठी नेहमी सक्रिय प्रयत्नशील असतात अशा धार्मिक, सामाजिक व राजकीय कार्यात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल रेखाताई मनेरे तुमचे हार्दिक हार्दिक अभिनंदन केले व खुप खुप शुभेच्छा दिल्या पत्रकार श्री. मा.महेश जोशी सर यांनी आज अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करून सामाजिक कार्यकर्तेत्या श्रीमती रेखाताई मनेरे यांना वाढ दिवसाच्या निमित्ताने अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमा पुष्प हार अर्पण करून सप्रेम भेट देण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सौ. रंजना दिपक ढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सौ.चंदा शेषेराव धोतरे यांची प्रमुख उपस्थिती होती आणि प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस मित्र परिवार समन्वय समितीच्या पाथरी तालुका अध्यक्ष सौ.सुशिला मनेरे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली कार्य क्रमाचे प्रास्ताविक व सूत्र संचालन पत्रकार व प्रहार संघटनेचे कार्यकर्ते श्री.. महेश जोशी यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्तेत्या श्रीमती रेखाताई मनेरे यांनी आभार मानले अशा प्रकारे पाथरी येथे अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रहार संघटनेच्या वतीने सत्कार मुर्ती, श्रीमती रेखाताई मनेरे यांना पुष्प हार आणि अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमा सप्रेम भेट देऊन भव्य, दिव्य असा सत्कार करण्यात आला.

# लालपरीच्या 77 व्या वर्धापन दिनानिमित्त प्रवाशांचे स्वागत

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



जिंतूर : येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या वतीने जिंतूर आगारा तर्फे ७७ वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्या वेळी प्रवाशांचे पुष्प व पेढे देऊन स्वागत करण्यात आले. लालपरी ही ग्रामीण भागातील जिवन वाहिनी ही आधुनिकतेच्या मार्गाने प्रवास करत आहे. आता लालपरी मध्ये चागल्या सुविधा देण्याचा प्रयत्न सुरु करत आहे. लालपरीत मोबाईल चार्जर, काही घटना टाळल्या साठी मोठ्या खिडक्या, महिलांना आरक्षण, दिव्यागंन नागरिकांना सीट ची सुविधा , माजी सैनिक, पत्रकार, यांना आरक्षित जागा ठेवण्यात आली. जेष्ठ नागरिक 50% अमृत जेष्ठ नागरिक 100% व महिलांना 50% तिकिट भाड्यामध्ये सवलती मिळत आहे त्या मुळे नागरिकांचा एसटीचा प्रवास म्हणजेच सुखाचा प्रवास समजला जातो. आज लाल परीचा वर्धापन दिनानिमित्त जिंतूर आगारा तर्फे प्रवाशांचे स्वागत करून पेढे वाटताना आगार प्रमुख आनंद चव्हाण, स्थानक प्रमुख रामेश्वर सोनवणे, वाहतूक निरीक्षक शरद पाटील, ग्राहक मंचाचे जिल्हाध्यक्ष गुलाब राव शिंदे, वाहतूक लिपिक गजानन घुगे, लिपिक मदन मुंढे, शिल्पा टारपे, सुनील घुगे, चालक ठाकाजी काळे आदींची उपस्थिती होती.

एसटीला ७७ व्या दिनानिमित्त प्रवाशांचे हाल पहाता लालपरी ही आधुनिक होऊन आपल्या सेवेत आणली. बस मध्ये आरक्षित जागा आहे. त्यावर तेच नागरिक बसावे या कडे वाहकांनी व आगार प्रमुख यांनी याची अंमलबजाणी करून जागा उपलब्द करून द्यावी. दिव्यांगन नागरी, पत्रकार, ज्येष्ठ नागरिक, आमदार, व महिला साठी राखीव जागेवर दुसरे न बसता त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

**- सचिन रायपत्रीवार, प्रवासी महासंघ तालुकाध्यक्ष जिंतूर -**

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्रीकृष्ण पंधे.**



बिबी : लोणार तालुक्यातील बिबि येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात दिनांक दिनांक 31 मे रोजी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची 300 वि जयंती धनगर समाज बांधवांच्या वतीने साजरी करण्यात आली यावेळी सकाळी दहा वाजता अहिल्या देवी होळकर यांच्या पुतळ्याचे येथील बिबि पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील समस्त धनगर बांधव गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या शुभहस्ते पूजा अर्चना करून मानवंदना केले त्यानंतर गावातील मुख्य रस्त्यावरून अहिल्या देवी होळकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकी मध्ये मुख्य रस्त्यावर महिला वर्गांनी रांगोळी काढून मिरवणुकीचे स्वागत केले या मिरवणुकीमध्ये समस्त धनगर बांधव महिला वर्ग गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी सुवर्ण शिलाचे ज्वेलर्स संचालक किशोर निंबेकर यांनी मिरवणुकीमध्ये असलेल्या भावी भक्ताचे स्वागत करून चहापाणी चि व्यवस्था केली होती त्यानंतर मुख्य रस्त्यावरील असलेले महापुरुषाचे पुतळे यांनाही समाज बांधवांनी पुष्पहार घालून मानवंदना केली त्यानंतर मिरुनिके चे समारोह अहिल्या देवी होळकर यांच्या पुतळ्या जवळ आरती करून झाले.

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त ग्राहक प्रबोधन सभा महान येथे आयोजित करण्यात आली

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भारत चव्हाण.**



सारकिन्ही : आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्य ग्राहक प्रबोधन सभा दि. अकोला व वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा महान येथे दिनांक 1 / 6 / 2025 रोजी पार पडली कार्यक्रमाचे अध्यक्ष बँकेचे संचालक मा श्री दामोदरजी काकड तसेच प्रमुख अतिथी म्हणून महान येथील सरपंच श्री.सुनिल ढाकोलकर, श्री. रमेश बेटकर सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी टाकळी, देवमन पाटील नानोटे अध्यक्ष विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या महान, श्री. बाबारावजी नानोटे अध्यक्ष आप्पानारायण शिक्षण संस्था, श्री. अनिल राऊत सेवा सोसायटी अध्यक्ष कोथली कार्यक्रमाचे प्रस्ताविक बँकेचे तालुका प्रमुख श्री. शिवदास भारसाकळे यांनी केले तसेच महान शाखेचे निरीक्षक श्री. अंकुश भौरदकर यांनी बँकेचे विविध डिजिटल बँकिंग प्रोडक्ट बद्दल माहिती दिली जसे कि, डिजिटल व्यवहार सुरक्षितेसाठी बँकेचे स्वतःचे डेटा सेंटर आणी डी. आर. साईट सायबर सुरक्षिततेसाठी सी.सॉस सेंटर बँकेचे मोबाईल अँप व एन. पी. सी. आय. नी जाहीर केलेली भारतातील पहिली जिल्हा मध्यवर्ती बँक जिचे सर्व A.T.M.टर्मिनल E.M.V. अनेबल आहेत. सदर सभेला महान शाखेशी संलग्न गावातील व्यवसायिक, शेतकरी प्रचंड संख्येने उपस्थित होते तसेच बँकेचे तालुका वरिष्ठ निरीक्षक श्री. कडू शाखाधिकारी दिपक कोकाटे , हर्षल पाठक सचिव व समस्त कर्मचारी उपस्थित होते.

# काजळेश्वर येथील आदिवासी मुलीच्या हत्त्या प्रकरणा समंधी आदिवासी पाड्यावर जनसेवक दत्ता पाटील डहाके यांची भेट; पोलीस तपास योग्य दिशेने असल्याच मत !

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**





कारंजा लाड : कारंजा तालुक्यातील ग्राम काजळेश्वर येथे तरुणीचा नग्न अवस्थेत मृत देह आढळल्याची घटना उमा प्रकल्प पुलाखाली दि.३० मे रोजी उघडकीस आली त्यामुळे जिल्हाभर एकच खळबळ उडाली . काजळेश्वर जवळील उमाप्रकल्प पुलाखाली मृतदेह दिसल्याने कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रविण खंडारे साहेब ;उप विभागीय पोलीस अधीकारी प्रदीप पाडवी साहेब यांनी पोलीस अधीक्षक अनुज तारे साहेब यांचे मार्गदर्शनात आपल्या पोलीस पथकासह तपास काम सुरु केले . सदर तपास हा योग्य दिशेने होत असल्याचे निदर्शनास येत आहे असे मत मांडत तपास असतांना तपासात सज्जन व्यक्तीला; निदोष व्यक्तीला त्रास होऊ नये याची दक्षता पोलीसा कडून घेतल्या जावी असे काजळेश्वर आदिवासी पाड्यावर सांत्व नापर भेटी दरम्यान दि .१ जून रोजी कारंजा येथील राष्ट्रवादीचे पक्षाचे प्रमुख तथा जनसेवक दत्तराज डहाके आले असता म्हणाले .वृत्त असे की ३० मे रोजी सदर घडणा उघडकीस आल्या नंतर कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार; उपविभागीय पोलीस अधीकारी प्रदीप पाडवी आपल्या पोलीसी फोर्स सह घटणा स्थळी खबर पोहचताच हजर झाले सोबत वाशिम फॉरन्सीक टिम ही होती . पंचनामा नंतर उत्तरीय तपासणी साठी मृतदेह हा कारंज उप जिल्हा रुग्णालयाला नेण्यात आला . ३१ मे रोजी पोस्टमार्टम झाल्या नंतर मृतदेह कुटूंबीयांचे ताब्यात देण्यात आला . दुपारी मृतदेतावर अन्त्य संस्कार काजळेश्वर येथे संपन्न झाला . दि १ जून रोजी डॉग पथक काजळेश्वर येथे दाखल झाले व तपासासाठी ठाणेदार प्रवीण खंडारे सकाळ संध्याकाळ काजळेश्वर येथे तपासासाठी येत आहेत त्यामुळे तपास योग्य दिशेने दिसत असल्याचे मत जनसेवक दत्ता भाऊ डहाके यांनी सांत्वना भेटीत आदिवासी पाड्यावर व्यक्त केले फक्त पोलिसांनी तपास कार्य करीत असतांना सज्जनांना; निर्दोष व्यक्तीला त्रास होऊ नये असे मत व्यक्त केले . अजूनही मुख्य आरोपी मिळाला नसल्याने त्याकरीता पोलीसांनासाठी हा घटणा आव्हाहन स्पद आहे . दोन दिवसात आरोपी पकडल्या जावा अन्यथा आम्हाला सीआडी तपासा कडे जावे लागेल असे याप्रसंगी जनसेवक दत्ता भाऊ डहाके म्हणाले .आदिवासी समाज बांधवाना कुटूंबीयांना पोलीस निश्चीत न्याय देतील असा आशावाद त्यांनी व्यक्त करीत त्यांना धीर दिला . आदिवासी समाज बांधवा तर्फे गोलू धुर्वे यांनी त्यांचे आभार मानले . याप्रसंगी सरपंच नितीन पा उपाध्ये; उपसरपंच तैसीम भाई; तंटामुक्ती अध्यक्ष सुभाष पाटील उपाध्ये; माजी ग्रापं सदस्य जम्मू भाई; कल्लू भाई; पंस सदस्य फौजी रंगराव धूवै; गोलू धुर्वे ज़ान तोडासे इत्यादी मान्यवर उपस्थीत होते .

**- प्रवीन खंडारे, पोलीस निरीक्षक, कारंजा ग्रामीणपोलीस स्टेशन -**

या अगोदर दोन संशयीतांना ताब्यात घेतले होते तपासा अन्ती त्यांना सोडले . त्यानंतर तीन संशयीत ताब्यात घेतले होते त्यांचा तपास सुरुआहे . आज डॉग पथक दाखल झाले . त्यानुसारही तपास चालू आहे . तपासयंत्रना तपास कार्य पोलीस अधीक्षक अनुज तारे साहेब; उपविभागीप अधिकारी प्रदीप पाडवी साहेब यांच्या मार्गदर्शनात ताकदीने कामाला लागली आहे .आरोपी लवकरच हाती येईल . मृत मुलीला त्यांच्या कुटूंबीयांना न्याय देण्यासाठी पोलीस तत्परतेने काम करीत आहे .